आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२५ नोव्हेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला प्रारंभ/ पहिल्याच दिवशी अदानी प्रकरणावरुन विरोधकांचा गदारोळ/ दोन्ही सदनांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- जागतिक सहकार परिषदेचं आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नवी दिल्लीत उद्घाटन

- २०१४ ते २०२४ या दहा वर्षाच्या काळात ५ लाख रेल्वे कर्मचाऱ्यांची भरती पारदर्शक पद्धतीने झाल्याचं रेल्वेमंत्र्यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्रात मुख्यमंत्रीपदासंदर्भात अद्याप निर्णयाची प्रतीक्षा/ शिवसेना विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी एकनाथ शिंदे यांची निवड

**आणि**

- बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेत भारताचा ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी दणदणीत विजय

**<><><><><>**

अदानी उद्योग समूहाविरोधातल्या कथित लाचखोरी प्रकरणावरून विरोधकांनी गदारोळ केल्यानंतर आज संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. आता दोन्ही सभागृहाचं कामकाज बुधवारी सुरू होईल.

**त्याआधी** लोकसभेत सुरुवातीला दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण, शेख नुरूल इस्लाम आणि माजी खासदार एम एम लॉरेन्स, एम पार्वती, आणि हरिश्चंद्र चव्हाण यांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर तहकूब झालेलं कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अदानी समूहावरल्या कथित लाचखोरी प्रकरण आणि उत्तर प्रदेशातल्या संभल इथल्या हिंसाचार प्रकरणावरून सभागृह

डोक्यावर घेतलं. त्यानंतर पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं.

**राज्यसभेतही** अदानी उद्योग समूहावर झालेल्या कथित लाचखोरी प्रकरणावरून विरोधकांनी स्थगन प्रस्तावाची मागणी केली होती, ती अध्यक्षांनी फेटाळून लावली.  हा प्रस्ताव अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार नसल्याचं कारण त्यांनी दिलं. भारतीय संविधानाला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत आहेत, त्यामुळे संसद सदस्यांनी लोकांसमोर उच्च आदर्श प्रस्थापित करावेत, अशी अपेक्षा धनखड यांनी व्यक्त केली.

राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खर्गे आणि डावे पक्ष, द्रमुक, राजद, आप यांच्या खासदारांनी अदानी समूहावरल्या कथित आरोपावर बोलायचा प्रयत्न केला, मात्र त्यांना परवानगी नाकारण्यात आली.

तत्पूर्वी राज्यसभेचे दिवंगत आजी माजी सदस्य सीताराम येचुरी, गुरूचरण कौर, धरमपाल सबरवाल, ग्यान प्रकाश पिलानिया, धनेश्वर मांझी, प्रवत कुमार समंतराय, यांना आदरांजली वाहण्यात आली. संविधानदिनानिमित्त उद्या दोन्ही सभागृहांची बैठक होणार नाही.

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विधायक चर्चा होईल, अशी आशा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. अधिवेशन सुरू होण्याआधी ते आज माध्यमांशी बोलत होते. भारताने संविधान स्वीकारून ५० वर्षे झाली आहेत हे यंदाचं वैशिष्ट्य असून यासह अनेक कारणांसाठी हे अधिवेशन विशेष असेल असं मोदी म्हणाले. लोकशाहीसाठी हा एक गौरवास्पद टप्पा आहे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी विरोधकांवर टीका केली. मतदारांनी सत्ता द्यायला नकार

दिलेले मूठभर लोक संसदेत विनाकारण गोंधळ करतात, असं ते म्हणाले. संसदेतल्या वेळेचा उपयोग देशाची प्रतिष्ठा जगात वाढवण्यासाठीच करायला हवा, अशी अपेक्षा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली. देशातल्या मतदारांचा संविधानाबद्दलचा विश्वास, लोकशाहीविषयीची वचनबद्धता यांना काही अर्थ आहे, असा संदेश संसदेतून जायला हवा, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

संविधान सभेतल्या वादविवादापासून प्रेरणा घेत सभागृहाच्या सदस्यांनी संसदेच्या शिष्टाचाराचं पालन करावं, असं आवाहन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत केलं. सभागृहाच्या सकारात्मक आणि रचनात्मक वादविवादाच्या परंपरेत सर्व खासदार भर घालतील अशी अपेक्षा व्यक्त करत संसदेच्या शिष्टाचाराचे उच्च आदर्श खासदारांनी प्रस्थापित करावेत, असं बिर्ला म्हणाले. संविधानाला कुठल्याही प्रकारचा धोका आहे असा काही जणांकडून केला जाणारा दावा सभापतींनी खोडून काढला. संविधान हे प्रत्येक नागरिकाचं असून त्यावर देशातल्या सर्व नागरिकांचा विश्वास असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. ओम बिर्ला यांची संपूर्ण मुलाखत आपल्याला आकाशवाणीच्या एफएम गोल्ड वाहिनीवर सुर्खियों में या कार्यक्रमात संध्याकाळी सात वाजून दहा मिनिटांनी ऐकता येईल.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयक २०२४ च्या संयुक्त संसदीय समितीमधल्या विरोधी पक्षांच्या खासदारांनी आज लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांची भेट घेतली. संयुक्त संसदीय समितीचे प्रमुख, विरोधी पक्षातल्या सदस्यांचं मत विचारात घेत

नसून अहवाल तयार करण्याची घाई करू नये असं आपण सभापतींना सांगितल्याची माहिती तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी या बैठकीनंतर माध्यमांना दिली. सभापतींनी विरोधी पक्षांच्या खासदारांचं म्हणणं ऐकून घेतलं आणि अहवाल सादर करण्याची मुदत वाढवण्याचं आश्वासन दिलं.

<><><><><>

उद्याच्या संविधानदिनानिमित्त आज नवी दिल्लीत हमारा संविधान हमारा स्वाभिमान पदयात्रा काढण्यात आली. डॉ. मनसुख मांडवीय, पीयुष गोयल, अर्जुन राम मेघवाल, किरेन रिजिजू, गजेंद्रसिंग शेखावत, रक्षा खडसे या केंद्रीय मंत्र्यांसह अनेक खासदार आणि ऑलिम्पिक मधे खेळलेले क्रीडापटू त्यात सहभागी झाले होते. त्याखेरीज राष्ट्रीय छात्रसेनेचे, राष्ट्रीय सेवायोजनेचे विद्यार्थी आणि इतर स्वयंसेवी संघटनांचे सदस्या मोठ्या संख्येने या सहभागी झाले होते.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत जागतिक सहकार परिषदेचं उद्घाटन होणार आहे. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेच्या गेल्या १३० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच ही परिषद भारतात होत आहे. उद्घाटनाच्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त एका विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण दुपारी ३ वाजल्यापासून आकाशवाणीवरुन ऐकता येईल. दररोज दुपारी ३ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज २ वाजून ५० मिनिटांनी प्रसारित होईल.

<><><><><>

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर सत्तास्थापनेबाबत विविध पातळ्यांवर चर्चा सुरु आहे. बहुमत मिळवणाऱ्या आघाडीतल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या विधिमंडळ पक्षांच्या नेत्यांची निवड झाली आहे. शिवसेनेच्या आज मुंबईत झालेल्या बैठकीत गटनेतेपदी विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची निवड एकमताने झाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतेपदी अजित पवार यांची निवड झाली. भाजपा विधिमंडळ पक्षाची नेता निवड अद्याप बाकी आहे. ती झाल्यावर मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय होईल, असं अजित पवार यांनी आज सातारा जिल्ह्यात कराड इथं सांगितलं. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि देशाचे माजी उपप्रधानमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त कराड इथल्या त्यांच्या स्मृतिस्थळावर पवार त्यांनी आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

संविधानाचा सन्मान केवळ संविधानाचं पुस्तक दाखवून होत नाही तर संविधानाचा सन्मान नतमस्तक होऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला होता . असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज सांगितलं महाराष्ट्रात नागपूर इथं आज अखिल भारतीय अनुसूचित जाती अनुसूचित जमाती रेल्वे कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय मेळाव्यात ते मार्गदर्शन करीत होते. २००४ ते २०१४ या १० वर्षात रेल्वेमधे ४ लाख ४० हजार कर्मचाऱ्यांची भरती झाली होती परंतु २०१४ ते २०२४ या दहा वर्षाच्या काळात ५ लाख रेल्वे कर्मचाऱ्यांची भरती ही पारदर्शक पद्धतीने झाली आहे. या भरती करिता एक वार्षिक कॅलेंडर सुद्धा रेल्वेने पहिल्यांदाच तयार केलं असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. दोन दिवसांच्या या मेळाव्यात या संघटनेचे देशभरातून सुमारे ३० हजार कर्मचारी सहभागी होत असल्याची माहिती संघटनेचे

विभागीय अध्यक्ष एम. चंद्रमोहन यांनी दिली. कोविडमुळे गेली पाच वर्ष संघटनेचा मेळावा होऊ शकला नव्हता.

<><><><><>

केंद्र सरकारचं महिला आणि बालविकास मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यामाने, आजपासून 'अब कोई बहाना नही' या अभियानाचा प्रारंभ करण्यात येणार आहे. महिलांवरच्या अत्याचाराचं निर्मूलन करण्याच्या दृष्टीनं हे अभियान राबवण्यात येणार आहे. अभियानाचा एक भाग म्हणून, 'अब कोई बहाना नही' या शीर्षकाच्या एका लघुचित्रपटाचं प्रदर्शन यावेळी करण्यात येणार आहे. याच वेळी नई चेतना या उपक्रमाच्या तिसऱ्या आवृत्तीलाही सुरुवात होणार आहे. दरवर्षी २५ नोव्हेंबर हा महिलांवरच्या अत्याचाराविरोधातला जागतिक दिवस म्हणून पाळण्यात येतो.

<><><><><>

बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी विजय मिळवला आहे. ५३४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सर्व गड्यांच्या मोबदल्यात ऑस्ट्रेलियाच्या २३८ धावा झाल्या. भारताकडून जसप्रित बुमराह,मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. तर वॉशिंग्टन सुंदर यानं दोन गडी बाद केले. काल विराट कोहली आणि यशस्वी जैस्वालच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताने दुसऱ्या डावात ६ बाद ४८७ धावा केल्या. त्यानंतर भारतानं डाव घोषित केला. ऑस्ट्रेलियाचा संघ फलंदाजीसाठी आला मात्र भारताच्या वेगवान गोलंदाजांच्या अचूक गोलंदाजीमुळे त्यांची फलंदाजी ढेपाळली. बुमराहनं नॅथन मॅकस्विनी आणि मार्नस लॅबुशेन यांचा बळी घेतला तर मोहम्मद सिराजनं पॅट कमिन्सला बाद केलं.

//<><><><><>//